■ वर्ष-०९ ■ अंक-११ ■ मुंबई, मंगळवार ३१ जानेवारी ते ०६ फेब्रुवारी - २०२३ ■ पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक
R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION
No.PLG/205/2022-2024

# पोलीस बातमी पत्र
POLICE BATMI PATRA

पोलीस बातमी पत्र

●संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG 2
शरीरात खराब कोलेस्ट्रॉल वाढल्यास ह्ययाह्ण गोष्टी चुकूनही खाऊ नका; नाहीतर गंभीर समस्या उद्भवू शकते

3 → उच्चशिक्षण इंग्रजीतून देणेच विद्यार्थिहिताचे!

वर्दळीच्या रस्त्यावरच एका तरुणावर दोन हल्लेखोरांचा चाकू हल्ला ← 4

www.policebatmipatra.in | policebatmi | police batmi patra | policebatmipatra | policebatmipatra@gmail.com

## क्राईम पेट्रोल पाहून पुजाऱ्याच्या वेशात जैन मंदिरात चोरी करणारा आरोपी अटकेत



मुंबई: पुजाऱ्याच्या वेशात येऊन आरोपी दररोज ५ जैन मंदिरांची रेकी करत होता. अखेर त्याने मालाड येथील एका जैन मंदिरात धार्मिक पोशाखात जाऊन सोन्याची वाटी आणि ताट लंपास केले. याप्रकरणी दिंडोशी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर 93 सीसीटीव्ही फुटेज पाहिल्यानंतर आरोपीच्या मुसक्या आवळण्यात आल्या आहेत. भारत सुखराज दोशी (53, रा. रामचंद्र लेन, मालाड पश्चिम) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.जैन मंदिराची रेकी करताना आरोपीअशी सुचली चोरीची कल्पना : गुन्हेगारी मालिका क्राईम पेट्रोल पाहून गुन्हा करणाऱ्या आरोपीला दिंडोशी पोलिसांनी अटक केली आहे, जो जैन धर्मा च्या धार्मिक पोशाखात मंदिरात पूजा करण्याच्या बहाण्याने जैन मंदिरात जात असे. मंदिरातील पुजाऱ्याचे सोन्याचे ताट व सोन्याचे ताट चोरून पळून गेला. क्राईम पेट्रोल पाहून स्वत:ला वाचवण्यासाठी जैन समाजाचा पोशाख परिधान...पान ३ वर...

**गुन्हेगारी मालिका क्राईम पेट्रोल पाहून गुन्हा करणाऱ्या एका आरोपीला दिंडोशी पोलीसांनी अटक केली आहे. तो जैन धर्मीयांच्या वेशात मंदिरात पूजा करण्याच्या बहाण्याने जैन मंदिरात जात असे, मंदिरातील पुजाऱ्याचे सोन्याचे ताट चोरून पळून जात असे.**

# Amazon मध्ये नोकरी देण्याच्या नावाखाली 11 हजार लोकांची फसवणूक

तुम्हाला देखील Amazon कंपनीत वर्क फॉर्म होम नोकरी देण्याचा दावा करणारे मेसेज येत आहेत का? जर तुमचं उत्तर हो असं असेल तर सावधान, दिल्ली पोलिसांनी सायबर गुन्हेगारांच्या एका आंतरराष्ट्रीय टोळीचा पर्दा फाश केला आहे. या टोळीने वर्क फॉर्म होमचा बनाव करून सुमारे 11 हजार लोकांची फसवणूक केली आहे. या सायबर ठगांची टोळी चीन आणि दुबईमध्ये असून त्यांचा मास्टरमाईंड जॉर्जियामध्ये आहे. दिल्ली पोलिसांनी आतापर्यंत सायबर फसवणुकीत गुंतलेल्या तीन जणांना अटक केली आहे. या प्रकरणात दिल्ली, गुरुग्राम आणि फतेहाबाद (हरियाणा) येथून वेगवेगळ्या छाप्यांमध्ये गुन्हेगारांना अटक करण्यात आली आहे. घरबसल्या नोकरीच्या ...पान ३ वर...




**तुम्हालाही वर्क फॉर्म होमची ऑफर आली का?**

## ठाण्यात आठवीच्या विद्यार्थिनीने आयुष्य संपवलं, मुख्यमंत्री शिंदेंच्या बंगल्याजवळील घटना





ठाणे : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे वास्तव्यास असलेल्या 'लॅन्डमार्क' येथे अल्पवयीन मुलीने आयुष्याची अखेर केली. इयत्ता आठवीमध्ये शिक्षण घेत असलेल्या एका विद्यार्थीनिने गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. या प्रकरणी वागळे इस्टेट पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. १३ वर्षीय विद्यार्थिनीने गळफास घेत जीवनयात्रा ...पान ३ वर...

## काय सांगता! तब्बल ८२ वर्षांचे आजोबा चालवायचे तिसऱ्या मजल्यावर गावठी दारूचा अड्डा

औरंगाबाद शहर पोलिसांच्या गुन्हे शाखेने केलेल्या एका गावठी दारूच्या विरोधात केलेली कारवाई चर्चेचा विषय बनला आहे. कारण शहराच्या मध्यवस्तीत सुरू असलेला गावठी दारूचा अड्डा चक्क एक 82 वर्षीय वृद्ध व्यक्ती चालवत होता. औरंगाबाद शहरातील दगड गल्ली, कुंभारवाड्यात छापा मारून पोलिसांनी तब्बल एक हजार 800 लिटर गावठी दारू आणि 400 लिटर दारू बनविण्याचे मिश्रण तसेच इतर ...पान ३ वर...



## 2 फेब्रुवारीला मुंबई महापालिकेचा अर्थसंकल्प; मुंबईकरांना काय मिळणार?

देशाची आर्थिक राजधानी म्हणून 'मुंबई'ला ओळखलं जातं. यात मुंबईची महानगरपालिका ही आशिया खंडातील सर्वा तश्रीमंत महापालिका म्हणून ओळखली जाते. त्यामुळे मुंबई महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पातून अनेकांना मोठी आशा असते. याच मुंबई महापालिकेचा 2023- 2024 या वर्षा चाअर्थसंकल्प 2 फेब्रुवारी रोजी सादर होणार आहे. यंदा मुंबई महापालिका प्रशासक हा अर्थसंकल्प मांडणार आहेत. महापालिकेच्या या अर्थसंकल्पातून नागरिकांसाठी पायाभूत सुविधा, आरोग्य, शिक्षण अशा गोष्टींवर भर दिला जातो. यामुळे मुंबईकरांच्या या अर्थसंकल्पातून कोणत्या अपेक्षा पूर्ण होणार? मुंबईकरांसाठी यातून काही नव्या घोषणा केल्या जाणार का? याकडे सर्वांच लक्ष आहे. मुंबई महानगरपालिकेच्या इतिहासात दुसऱ्यांदा प्रशासकाकडून अर्थसंकल्प मांडला जाणार आहे. 2023- 2024 चा अर्थसंकल्प 2 फेब्रुवारी रोजी मुंबई महापालिकेचे प्रशासक आणि आयुक्त डॉ. इकबाल सिंह चहल मांडणार आहेत आणि तेच मंजुरी देणार आहेत. यंदाचा अर्थसंकल्प हा आगामी ...पान ३ वर...




## मुंबई विमानतळावर 9.5 किलोचे सोने जप्त



मुंबई विमानतळावर 9.5 किलोचे सोने जप्त करण्यात आले असून सीमाशुल्क विभागाकडून मोठी कारवाई करण्यात आली आहे. सीमाशुल्क विभागाने वेगवेगळ्या आठ प्रकरणांमध्ये सुमारे 9.5 ...पान ३ वर...

## चक्क भाच्यानंच दिली मामा-मामीला लुटण्याची सुपारी; पोलीस तपासात धक्कादायक माहिती समोर

नांदेड जिल्ह्यातील देगलूर येथे दरोडा टाकून घरातील चार लाखांचा ऐवज लंपास करत, वृध्द दांपत्याचे दोरीने हातपाय बांधून महिलेची हत्या करण्यात आली होती. ही घटना 23 जानेवारीला समोर आली होती. या घटनेनं नांदेड जिल्हा हादरला होता. मात्र पोलिसांनी तपासाची चक्र फिरवत अखेर आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत. विशेष म्हणजे, भाच्यानेच आपल्या मामा-मामीला लुटण्याची सुपारी दरोडेखोरांना दिली असल्याचे तपासात समोर आले आहे. त्यामुळे या प्रकरणात भाच्यासह पाच आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे. श्रीपतराव रामजी पाटील आणि चंद्रकलाबाई श्रीपतराव पाटील, असे मृत पतीपत्नीचे नावं असून, शहाजी मरतळे असे आरोपी भाच्याचे नाव आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, देगलूर शहरातील उदगीर रस्त्यावरील शास्त्रीनगरमध्ये श्रीपतराव रामजी पाटील यांच्या घरावर दरोडा पडल्याची घटना ...पान ३ वर...



## एटीएम कार्ड ऍक्टिव्ह करण्याच्या नावाखाली वृद्ध शिक्षिकेला घातला गंडा; दोघांना पोलिसांनी ठोकल्या बेड्या



मुंबई : दोन्ही आरोपी एटीएम सेंटरमध्ये बँकेचे ग्राहक म्हणून उभे होते. आपल्या जाळयात कोणी फसते का हे पाहत होते. संधी साधून ज्येष्ठ नागरिक महिलेला मदतीच्या नावाखाली दोन भामट्यांनी दुसऱ्या एटीएम सेंटरमध्ये नेले. त्यांनी हातचलाखी करुन महिलेला दुसरेच एटीएम कार्ड देऊन पळ काढला. मालाडशिवाय इतर अनेक पोलिस ठाण्यात आरोपींविरुद्ध असे ५ हून अधिक फसवणुकीचे गुन्हे दाखल आहेत.फसवणुकीचा गुन्हा दाखल : सेवानिवृत्त महिला शिक्षिकेच्या तक्रारीवरून मालाड पोलिसांनी फसवणुकीचा गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे. मालाड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवी अडाणे यांनी सांगितले की, महिलेने स्टेट बँक ऑफ इंडिया मालाड शाखेतून नवे एटीएम कार्ड मागितले होते. महिलेला एटीएम कार्ड मिळाल्यानंतर ती बँकेत घेऊन गेली. बँक कर्म चाऱ्यांना एटीएम कार्ड ऍक्टिव्ह करण्यास सांगितले. बँकेच्या एटीएम ...पान ३ वर...

महाराष्ट्र शासन | आज़ादी का अमृत महोत्सव | G20

शांतीचा संदेश
ऐक्याची भाषा
समृद्ध भारत
विश्वाची आशा...



प्रजासत्ताक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

एक पृथ्वी • एक कुटुंब • एक भविष्य
वसुधैव कुटुम्बकम्

श्री. नरेंद्र मोदी, मा. प्रधानमंत्री | श्री. एकनाथ शिंदे, मा. मुख्यमंत्री | श्री. देवेंद्र फडणवीस, मा. उपमुख्यमंत्री

www.mahasamvad.in | /MahaDGIPR | /MaharashtraDGIPR | महाराष्ट्र शासन | माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन

पोलीस बातमी पत्र

मुंबई

मुंबई, मंगळवार ३१ जानेवारी ते ०६ फेब्रुवारी - २०२३



# साप्ताहिक राशी भविष्य

## मेष — बोलण्यावर नियंत्रण ठेवा

प्रतिकूल ग्रहस्थितीमुळे त्रास होण्याची शक्यता. नव्या ओळखी-परिचय होतील, मात्र त्यात गैरसमज निर्माण होण्याची शक्यता आहे. वादही संभवतात. सहकारी बाजू शाबूत ठेवतील. बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवा. गोड बोलून कार्यभाग साधा. संयम, सत्याची कास आणि प्रयत्नांच्या आधारे पुढे जाऊ शकाल. प्रकृतीची पथ्ये पाळा.

**शुभ दिनांक** २९, २, ३.

## वृषभ — विजयोत्सव साजरा कराल

ग्रहमान सगळ्यात शुभ फलदायी ठरणार आहे. मनात काही गोष्टी ठरवा त्याप्रमाणे नियोजन करा. योग्य त्या वस्तू, व्यक्तींची निवड करा आणि कामाला लागा. यश आपलेच आहे. चौफेर बाजूंनी विजयोत्सव साजरा करता येणार. राजकारण, समाजकारण वा सांस्कृतिक व्यासपीठावरून आपल्या नावाचा झेंडा उंचावत राहील.

**शुभ दिनांक** ३०, ३१, १, ४.

## मिथुन — आपले घोडे दामटू नका

प्रमुख ग्रहांच्या प्रतिकूलतेमुळे परिस्थिती विचित्र होण्याची शक्यता आहे. अशा ग्रहस्थितीत धीराने आणि संयमाने राहणे हितकारक ठरेल. हुशारीने वागा. आपले घोडे पुढे दामटू नका. संयम, सामंजस्य, समजूतदारपणा यांचा समन्वय साधा. जबाबदाऱ्या अंगावर पडतील, ओळखी होतील. कलावंतांसाठी उत्साहवर्धक.

**शुभ दिनांक** २९, २, ३.

## कर्क — आत्मविश्वासाने पुढे जा

न्याय क्षेत्रात काम करणाऱ्यांना चांगले यश मिळू शकते. आध्यात्मिक क्षेत्रातही अनुभवांची नोंद होईल. सध्या आत्मविश्वासाने पुढे जाता येईल. मतभेद, वाद यांना रोखून मात करायची आहे. आरोग्यदृष्ट्या एखादा अनिष्ट संकेत मिळणे शक्य. मिळणारा प्रतिसाद, मिळणारे सल्ले आणि पाठिंबा यांचा उपयोग होऊ शकेल.

**शुभ दिनांक** २९, ३०, ३१, १, ४.

## सिंह — कामे मार्गी लागतील

नव्या वास्तूचे प्रस्ताव, गुंतवणुकीच्या संधी येतील. विचारपूर्वक निर्णय घेऊन ती गुंतवणूक करा. नशिबाची साथ असते म्हणजे काय असते हे अनुभवू शकाल. हितशत्रूंना परस्पर वचक बसेल. अडलेली कामे मार्गी लागतील. नावलौकिक वाढता राहील. केलेले कर्तृत्व आणि दाखवलेले कौशल्य यांचा योग्य परतावा मिळत राहील.

शुभ दिनांक ३०, ३१, १, २, ३.

## कन्या — निराशेतून बाहेर पडाल

प्रतिकूल ग्रहमानात प्रवास करणे त्रासदायक. अशात मानसिक स्वास्थ्य टिकवणं कठीण राहील. परिवारातील सदस्यांची मोलाची मदत होईल व निराशेतून बाहेर ते पडण्यास मदत करतील. कोणतेही साहसी कृत्य, धाडस टाळा. वागण्याची काही पथ्ये पाळणे आवश्यक राहील. व्यवहारात सावध राहा. वरिष्ठांशी मिळतंजुळतं घ्या.

**शुभ दिनांक** २, ३, ४.

## तूळ — मेहनतीने उत्कर्ष साधाल

अडथळे व त्रास सहन करावा लागेल. जुन्या गोष्टींचे वाद, गैरसमज उकरून काढू नका. रागावर योग्य नियंत्रण ठेवा. शांत राहण्याचा प्रयत्न करा. मित्रमंडळी आपली बाजू सावरण्यास मदत करतील. नको त्या प्रलोभनात अडकू नका. कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या. नोकरी-व्यवसाय यात मेहनत घेऊन उत्कर्ष साधा.

**शुभ दिनांक** २९, ४.

## वृश्चिक — चांगले अनुभव मिळतील

नोकरदारांना संधी मिळत राहतील. कष्टाला पर्याय नाही हे मूळ सूत्र विसरू नका. पण त्यातून विजय मिळत राहणार आहे. वैवाहिक व कौटुंबिक जीवनातही अन्य सदस्यांना मिळणारा विजयी प्रतिसाद आपल्याही आनंदात भर घालत राहील. आध्यात्मिक क्षेत्रात असणाऱ्यांना या सप्ताहात चांगले अनुभव मिळतील.

**शुभ दिनांक** २९, ३०, ३१, १.

## धनु — पदाचा योग्य वापर करा

द्विधा मन:स्थितीत व दोलायमान अवस्थेत असण्यापेक्षा ठाम निर्णय घेणे अंगी बाणवणे गरजेचे ठरेल. त्यातूनच अनेक गोष्टी मिळवता येतील. नव्या व्यवसायात आपला जम लगेच बसू शकेल. सहकाऱ्यांचे सहकार्य चांगले मिळत राहील. पदाचा योग्य तो वापर करून पुढे जाण्याच्या संधी मिळत राहतील.

**शुभ दिनांक** ३०, ३१, १, २, ३.

## मकर — शांतचित्ताने निर्णय घ्या

मिश्र ग्रहमानातून प्रवास करीत आहात. अशात पथ्ये पाळणे आवश्यक राहील. प्रत्येक कार्याच्या वस्तुस्थितीचा विचार करा, कोणावरही फाजील विश्वास न टाकता, शांतचित्ताने, सावधपणे निर्णय घ्या. वाद टाळा. प्रकृतीकडे लक्ष द्या. मानसिकता बिघडू देऊ नका. शुक्राचे भ्रमण कौटुंबिक स्थितीला मदत करणारे राहील.

**शुभ दिनांक** २, ३, ४.

## कुंभ — वेळ सत्कारणी लावा

प्रमुख ग्रहांच्या विरोधी परिस्थितीमुळे सावधगिरीने व विचारपूर्वक निर्णय घ्या. मिळणारा वेळ सत्कारणी लावण्याचा प्रयत्न करा. मानसिकता आपल्या ध्येयापासून विचलित होणार नाही याची दक्षता घ्या. कार्यक्षेत्रात कामाचा प्रभाव पाडू शकाल. व्यवहारात सतर्क राहा. आर्थिक बाजू ठीक राहील. काही येणे मिळण्याची शक्यता.


**शुभ दिनांक** २९, ४.

## मीन — तंत्र-प्रयत्नाची सांगड घाला

शुभ ग्रहांच्या प्रतिकूलतेने नवीन प्रश्न निर्माण होतील. वरिष्ठांची नाराजी, वाढता खर्च, वाद, प्रकृतीच्या तक्रारी, विरोधकांचा ससेमिरा यांना सामोरे जावे लागणार आहे. अशात संयम, सामंजस्य, गोड बोलून कार्यभाग साधण्याचे तंत्र व प्रयत्न यांची योग्य सांगड घालून पुढे जाण्याचा मार्ग काढावा लागणार आहे. कायदा पाळा.

**शुभ दिनांक** ३०, ३१, १.

# शरीरात खराब कोलेस्ट्रॉल वाढल्यास ह्यायाह्न गोष्टी चुकूनही खाऊ नका; नाहीतर गंभीर समस्या उद्भवू शकते



उच्च कोलेस्ट्रॉलचे रुग्ण हिवाळ्यात अधिक चिंतेत असतात. हवामानात वारंवार होणाऱ्या बदलांमुळे रक्तातील लिपिडच्या पातळीत चढ-उतार होत राहते. खराब कोलेस्टेरॉलची पातळी जितकी जास्त असेल तितका हृदयविकाराचा धोका जास्त असतो. अनेक संशोधने पुढे आली आहेत ज्यावरून असे दिसून आले आहे की हिवाळ्यात हृदयविकाराचा झटका अधिक येतो आणि त्याचे मुख्य कारण खराब कोलेस्ट्रॉल पातळी मानले जाते. आहारातील चुकांमुळे खराब कोलेस्टेरॉल (LDL) ची पातळी देखील वाढू शकते. त्यामुळे असे पदार्थ आहारात खाणे टाळले पाहिजे.

**अंडी खाणे टाळा**

एनसीबीआय मध्ये प्रकाशित झालेल्या अहवालानुसार, उच्च कोलेस्ट्रॉलच्या रुग्णांनी अंड्यापासून दूर राहावे. अंड्यामध्ये संतृप्त चरबी असते आणि जास्त प्रमाणात खाल्ल्यास याचे वाईट परिणाम होऊ शकतात. खराब कोलेस्टेरॉल असलेल्या लोकांनी यकृत आणि हृदयाच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी अंडी खाऊ नयेत. मात्र, ते खाण्यापूर्वी तुम्ही तज्ज्ञांचा सल्ला नक्कीच घेऊ शकता.

**तळलेले आणि मसालेदार पदार्थ**

मसाले आणि तेलाने बनवलेल्या गोष्टींना चव खूप छान असते पण हे पदार्थ प्रत्येकासाठी विषासमान असतात. केवळ उच्च कोलेस्टेरॉलच नाही तर सामान्य व्यक्तीनेही अशा अन्नाचे सेवन टाळावे. पबमेडच्या अहवालानुसार अशा खाद्यपदार्थांमध्ये कॅलरीजचे प्रमाण जास्त असते. ज्या लोकांची कोलेस्टेरॉलची पातळी आधीच जास्त आहे त्यांनी तळलेल्या अन्नाकडे पाहू नये.

**प्रक्रिया केलेले मांस**

अन्नपदार्थ दीर्घ काळ साठवण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारे तयार केले जातात. त्यात कोलेस्टेरॉलचे प्रमाण जास्त असल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. म्हणूनच ते कमी प्रमाणात खाण्याचा सल्ला दिला जातो. अगदी मांसाहारी पदार्थांमध्येही कॅलरीज जास्त असतात आणि ते एका मर्यादित न खाल्ल्याने कोलेस्ट्रॉल तर वाढतेच शिवाय शरीरात आरोग्याच्या अनेक समस्या निर्माण होतात.

# एक कप नारळ पाण्यात भरपूर पोटॅशियम-मॅग्नेशियम:हिवाळ्यात ब्लड शुगर ठेवते नियंत्रणात, स्पोर्ट्स ड्रिंकपेक्षा दुप्पट फायदेशीर




फक्त उन्हाळ्यातच नाही तर हिवाळ्यातही नारळ पाणी पिणे आरोग्यासाठी चांगले असते. तसे, नारळाच्या पाण्याचा प्रभाव थंड मानला जातो. ज्या लोकांना सर्दी जास्त संवेदनशील असते त्यांनी फक्त दिवसा नारळाचे पाणी प्यावे.

नारळाच्या पाण्यात इलेक्ट्रोलाइट्स, खनिजे, अँटी-ऑक्सिडंट्स आणि जीवनसत्त्वे भरपूर प्रमाणात असतात. त्यात पोषक तत्वे भरलेली असतात. हे केवळ आपली रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करत नाही तर शरीराची इतर कार्ये देखील सुरळीत करते.

डायटीशियन डॉ.विजयश्री प्रसाद सांगतात की, हिवाळ्यात लोक कमी पाणी पितात. अशा परिस्थितीत नारळ पाणी पिणे हा एक चांगला पर्यायआहे. त्यात नैसर्गिक इलेक्ट्रोलाइट्स असतात. जसे की सोडियम, पोटॅशियम, मॅग्नेशियम, फॉस्फरस आणि कॅल्शियम. या सर्वांचा मिळून आपल्या शरीराला वेगवेगळ्या प्रकारे फायदा होतो. पोटॅशियम द्रव आणि इलेक्ट्रोलाइट्सची पातळी संतुलित करते.

**किडनी व्यवस्थित काम करते**

एक कप नारळाच्या पाण्यात 600 मिलीग्राम पोटॅशियम असते. हे आपल्या आहारातील 16% पोटॅशियम प्रदान करते. मूत्रपिंड आणि स्नायूंच्या योग्य कार्यासाठी पोटॅशियम खूप महत्वाचे आहे. त्याचप्रमाणे, एक कप नारळाच्या पाण्यात 60 मिलीग्राम मॅग्नेशियम असते, जे आपल्या आहाराच्या 14% आहे.

**विषारी पदार्थ बाहेर काढते**

नारळाच्या पाण्यात लघवीचे प्रमाण वाढवणारा पदार्थ असतो. हे शरीरातील विषारी पदार्थ काढून टाकण्यास मदत करते. शरीरातील वाढलेले पाणी लघवीच्या स्वरूपात बाहेर टाकले जाते.

**नारळाच्या पाण्यात 95% पाणी**

नारळाच्या पाण्यात 95% पाणी असते. हे कोणत्याही स्पोर्ट्स ड्रिंकपेक्षा दुप्पट फायदेशीर मानले जाते. हे आपल्या शरीरातील इन्स्टंट इलेक्ट्रोलाइट्सची कमतरता पूर्ण करते. साध्या पाण्याच्या तुलनेत नारळाच्या पाण्यात अनेक गुण असतात.

**त्वचेची चमक वाढते**

थंडीमुळे आपली त्वचा कोरडी होते. दररोज नारळपाणी प्यायल्याने त्वचेला पुरेशी आर्द्रता मिळते. संशोधनात नारळाच्या पाण्याचा सूक्ष्मजीवविरोधी प्रभाव आढळून आला आहे. यामुळे मुरुमेही बरे होऊ शकतात. डॉ विजयश्री सांगतात की नारळपाणी प्यायल्याने आपली त्वचा चमकदार होते.

**रक्तदाब नियंत्रित राहतो**

हिवाळ्यात लोक उच्च रक्तदाबाची तक्रार करतात. अशा परिस्थितीत नारळ पाणी पिणे खूप फायदेशीर आहे. यामध्ये असलेले पोटॅशियम रक्तदाब नियंत्रित ठेवते. दररोज एक कप नारळ पाणी प्यायल्याने रक्तातील साखरेची पातळी कमी राहते. त्यात नैसर्गिक साखर असते, त्यामुळे हे पाणी दररोज मर्यादितप्रमाणात घ्यावे.

**ब्लड क्लॉटिंग कमी करते**

नारळाच्या पाण्यात कोलेस्टेरॉल आणि ट्राय-ग्लिसराइडचे प्रमाण कमी आढळते. हिवाळ्यात याचे नियमित सेवन केल्यास रक्त गोठत नाही. हृदयविकाराचा धोकाही कमी राहतो.

**नारळ पाणी हे नैराश्यविरोधी औषध**

नारळाच्या पाण्यात अँटिऑक्सिडेंट असतात जे तणाव कमी करतात. हिवाळ्यात लोकांमध्ये नैराश्य जास्त दिसून येते.

# मैदानी खेळ:मुलांच्या स्क्रीन टाइमवर निसर्ग हा उपाय, रोज स्क्रीन टाइमइतका वेळ बाहेर खेळणे आवश्यक



सध्याची पिढी आणि मागील पिढीतील सर्वात मोठा फरक म्हणजे निसर्गाच्या सान्निध्यात घालवलेला वेळ. परिणामी मुले शारीरिकदृष्ट्या कमकुवत होत आहेत. त्यांच्या सामाजिक विकासावर परिणाम होत आहे. हार्वर्डच्या म्हणण्यानुसार, बाहेर कमी सक्रिय राहणारी मुले यशस्वी होण्याची शक्यता कमी असते. ३-५ वर्षांच्या मुलांनी दिवसभर सक्रिय असले पाहिजे. ६ ते १७ वयोगटातील मुलांनी दिवसातून ६० मिनिटे खेळले पाहिजे. बाहेर खेळणे यासाठी आवश्यक आरोग्यासाठी यामुळे पंचेंद्रियांचा उत्तम विकास होतो मुले बाहेर खेळतात तेव्हा त्यांच्या दृष्टी, श्रवण, स्पर्श, गंध आणि चव या पाच ज्ञानेंद्रियांचा सर्वांगीण विकास होतो. ते अधिक कॅलरीज बर्न करतात, त्यामुळे लठ्ठपणाचा धोका कमी होतो. याशिवाय स्नायू आणि हाडे मजबूत होतात. व्हिटॅमिन डीचे उत्पादन पुरेसे होते, त्यामुळे गंभीर शारीरिक आणि मानसिक रोगांचा धोका कमी होतो. यशासाठी शिकण्याची क्षमता व आत्मविश्वास वाढतो यशासाठी नियोजन, प्राधान्यक्रम ठरवणे, समस्या सोडवणे, वाटाघाटी आणि मल्टिटास्किंग आवश्यक आहे. मूल नैसर्गिक वातावरणात मित्रांसोबत खेळते तेव्हा ही कौशल्ये उत्तम प्रकारे विकसित होतात. ते फक्त शिकत नाही तर खेळताना ते वापरतेही. खेळादरम्यान त्याची जोखीम घेण्याची क्षमता वाढते, त्यामुळे त्याचा आत्मविश्वास वाढतो.

# असुरक्षित संबंधांचा कॅन्सर:जगातील एक चतुर्थांश गर्भाशयाचे कॅन्सर इथेच, 73% महिलांना माहितीच नाही, पुरुषांनाही धोका


जानेवारी हा सर्व्हायकल कॅन्सर जनजागृतीचा महिना मानला जातो. जगात दर दुसऱ्या मिनिटाला एका महिलेचा सर्व्हायकल कॅन्सरने मृत्यू होतो. ब्रेस्ट कॅन्सरनंतर भारतात हा दुसरा कॅन्सर आहे, जो महिलांचा शत्रू आहे.

सर्व्हायलकॅन्सर गर्भाशयाच्या तोंडाचा कॅन्सर आहे, जो एका विषाणूमुळे होतो. तो शारीरिक संबंधांतून पसरतो. हा कॅन्सर महिलांसाठी इतका घातक आहे की सरकारने देशातील सर्व शालेय विद्यार्थिनींना याची लस मोफत देण्याचा निर्णय घेतला आहे. सेर्वाव्हॅक नावाची स्वदेशी लस सीरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाने विकसित केली आहे. ड्रग्स कंट्रोलर जनरल ऑफ इंडियाने याला हिरवा झेंडा दाखवला आहे. ही वन शॉट लस आहे. म्हणजेच ही 9 ते 14 वर्षे वयाच्या मुलींना केवळ एकाच वेळी दिली जाईल. भारतात सध्या सर्व्हायकल कॅन्सरपासून बचावासाठी ज्या लस दिली जात आहे त्या सर्व परदेशी आहेत आणि त्यांचे दोन डोस लागतात. सेर्वाव्हॅक लस शाळेत मोफत मिळेल, मात्र बाजारात याची किंमत 200 ते 400 रुपये असेल.

हा निर्णय सरकारी पॅनल नॅशनल टेक्निकल ॲडव्हायजरी ग्रुप ऑफ इम्युनायझेशनच्या सल्ल्याने घेतला गेला आहे. शाळेत लसीकरण मोहीम युनिव्हर्सल इम्युनायझेशन प्रोग्रामअंतर्गत चालवली जाईल. एचपीव्ही लस किशोरवयात घेतल्यास सर्व्हायकल कॅन्सर होण्याची शक्यता खूप कमी होते. सर्वात आधी सांगूया कि सर्व्हायकल कॅन्सर काय असतो? सेक्शुअली ट्रान्समिटेड इन्फेक्शन आहे सर्व्हायकल कॅन्सर सर गंगाराम रुग्णालय, दिल्लीतील गायनॅकोलॉजिस्ट डॉक्टर रूमा सात्विक यांच्यानुसार सर्व्हायकल कॅन्सर सर्व्हिक्स म्हणजेच गर्भाशयाच्या तोंडाचा कॅन्सर असतो. हा युट्रसचा खालचा भाग असतो, जो गुप्तांगाशी जोडलेला असतो. हा कॅन्सर ह्युमन पॅपीलोमोव्हायरसने होतो. हा व्हायरस संबंध ठेवताना शरीरात जातो. म्हणजेच हा सेक्शुअली ट्रान्समिटेड डिसीज आहे, जो कॅन्सरचे रूप घेतो. 9 ते 14 वर्षांपर्यंत मुलींनी घेतली पाहिजे ही लस सर्व्हायकल कॅन्सर ह्युमन पॅपीलोमोव्हायरसने पसरतो. म्हणून तो रोखण्यासाठी एचपीव्ही लस घेतली जाते. डॉ. रुमा सात्विक यांनी सांगितले की या आजारापासून वाचण्यासाठी किशोरवयातच मुलींना एचपीव्ही लस दिली जाते.




ही घेण्याचे योग्य वय 9 ते 14 वर्षे आहे. हे यासाठी कारण तेव्हा मूल लैंगिकरित्या सक्रीय नसते. सर्व्हायकलकॅन्सर हा संबंध ठेवल्याने होतो त्यामुळे कमी वयातच मुलींना याची लस दिली पाहिजे. जेणेकरून भविष्यात त्यांना जोडीदाराकडून नको असलेला विषाणू मिळू नये. जर मिळाला तरी सर्व्हिक्सवर त्याचा कोणताही परिणाम होऊ नये. प्रत्येक पालकाने आपल्या मुलीला ही लस दिली पाहिजे. भारतात 2008 पासून गार्डासिल आणि सेर्व्हारिक्स नावाच्या दोन लस उपलब्ध आहेत. याचा एक डोस 3 हजार ते 10 हजार रुपयांना मिळतो. 45 वर्षांच्या वयापर्यंत महिला लस घेऊ शकतात मॅक्स सुपरस्पेशालिटी रुग्णालय, दिल्लीतील गायनॅकोलॉजिस्ट डॉ. सुनीत कौर मल्होत्रांनी सांगितले, भारतात 45 वर्षे वयापर्यंतच्या महिला ही लस घेऊ शकतात. मात्र लसीसोबतच पॅप स्मीअर टेस्टही करण्याचा सल्ला दिला जातो. जर पॅप स्मीअर टेस्टमध्ये कॅन्सरचे निदान झाले तर ही लस दिली जात नाही. पॅप स्मीअर टेस्टमध्ये ब्रशच्या सहाय्याने सर्व्हिक्सचे सेल्स घेतले जातात. सूक्ष्मदर्शकाच्या मदतीने याची पडताळणी केली जाते. ज्याने सर्व्हायकल कॅन्सरचे निदान होते. विवाहित महिलांनाही लागते लस, अनेक संसर्गापासून संरक्षण डॉ. रुमा सात्विक सांगतात की, लैंगिकदृष्ट्या




सक्रीय महिलांनाही या लसीचा डोस दिला जातो. वास्तविक, सामान्यपणे डॉक्टर असे मानतात की महिलेचा पूर्ण आयुष्यात एकच लैंगिक जोडीदार असतो. यामुळे त्यांच्यात सेक्शुअली ट्रान्समिटेड इन्फेक्शनची शक्यता शून्य आहे. मात्र हे गरजेचे नाही की महिलेला एचपीव्ही इन्फेक्शनच व्हावे.

# पोलीस बातमी पत्र

महामुंबई

मुंबई, मंगळवार ३१ जानेवारी ते ०६ फेब्रुवारी - २०२३




संपादकीय...



## ‘ले ऑफ’चे महाभारत

आज जगभरात सर्वत्र ‘ले ऑफ’ या दोन शब्दांची चर्चा आहे. गुगल, मायक्रोसॉफ्ट, अमैझॉन वगैरे कंपन्यांनी हजारो कर्मचाऱ्यांची कपात केली आहे आणि पुढेही ती होतच राहणार आहे. विशेषतः आयटी म्हणजे माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपन्यांनी कर्मचाऱ्यांना कमी करणे हाच आपला मूलमंत्र ठरवला आहे. सुंदर पिचाई हे गुगलचे प्रमुख. आम्हाला लोक का कमी करावे लागत आहेत, याचे फक्त एका ई-मेलद्वारे स्पष्टीकरण देतात. पण खरी कारणे सांगतच नाहीत. जागतिक मंदीचा फटका बसत आहे आणि त्यात सर्वात स्वस्त आणि सोपा उपाय म्हणजे कर्मचाऱ्यांची कपात हाच मानला जातो. वास्तविक यात कंपन्यांचेही नुकसान होतच असते. याच ले ऑफचे सर्वंकष दुष्परिणाम कसे होतात, ते पाहणे आवश्यक आहे आणि अर्थशास्त्राला गती देण्यासाठी तो मूलमंत्र ठरू शकत नाही, हे दाखवणारेही आहे. आपल्या कंपनीतील सर्वोत्कृष्ट मेंदू असलेल्या लोकांना कंपनी सोडून जा म्हणून सांगितल्यावर त्यांच्या सर्वोत्कृष्ट सेवांपासून कंपनी पारखी होतेच. याचा परिणाम भविष्यकालीन लाभांवर होतोच. पण कंपन्यांना तत्कालिक फायदा दिसत असल्यामुळे त्यांना या कटू निर्णयाप्रत यावे लागते. मंदीमुळे नवीन ऑर्डर मिळणे बंद होते आणि मग आऊटसोर्सिंगवर ज्यांचे कामकाज चालते, त्या आयटी कंपन्यांना कर्मचारी कमी करण्याशिवाय पर्याय राहात नाही. जेव्हा एखादी कंपनी काही चांगल्या कर्मचाऱ्यांची कपात करते तेव्हा त्यांनी दिलेल्या योगदानापासून कंपनी वंचित होते. हे कर्मचारी उत्कृष्ट असतात कारण त्यांच्यामुळे साधारण कर्मचाऱ्यांचे साधारण काम झाकले जाते. पण, याचा दुसरा असा परिणाम होतो की, जेव्हा कंपनीचे सर्वोत्कृष्ट आणि वरिष्ठ श्रेणीचे कर्मचारी हाकलले जातात (ले ऑफ हा एक सभ्य शब्द त्यासाठी वापरला जातो) तेव्हा इतर उच्च कामगिरी करणाऱ्या लोकांनाही धक्का बसतो आणि ते मग दुसरीकडे नोकरी शोधू लागतात आणि मग त्यांना कंपनीसाठी मनापासून काही करण्याची इच्छा राहात नाही. त्यामुळे हा कंपनीचा दुहेरी तोटा होतो. अमेरिकेसह जगभरात सध्या याच एका विषयाची चर्चा सुरू असताना भारतात मात्र अजून यावर फारशी चर्चा सुरू झालेली नाही. भारतातील आयटी कंपन्यांनी अजून कर्मचारी कपात केली नाही. पण सर्वोच्च स्तरावरील कर्मचाऱ्यांना शक्यतो नारळ दिला जाऊ नये. कारण त्या निर्णयाचे चौफेर परिणाम होतात आणि ते कंपनीलाच भोगावे लागतात. पण आय टी क्षेत्र मंदीतून जात असल्याने कर्मचारी कपात करणे कसे अपरिहार्य आहे, वगैरे सांगितले जाते. आर्थिक मंदीचा एक अपरिहार्य परिणाम म्हणजे कर्मचारी कपात आणि त्यातही अकुशल कर्मचाऱ्यांना त्याचे परिणाम भोगावे लागतात. वास्तविक ते अकुशल असल्याने दुसरीकडेही नोकरी मिळवण्यास फारसे पात्र नसतात. बेरोजगारी वाढते ती यामुळे. कारण कोणतीही कंपनी सर्वोच्च कौशल्य असलेल्या कर्मचाऱ्यांना काढण्याचा धोका पत्करू शकत नाही. पण याचा फटका असा बसतो की नोकरी गेल्यामुळे कर्मचारी कर्जाची परतफेड करण्यास असमर्थ ठरतात आणि त्यामुळे अर्थातच वित्तीय संस्थांना कंपनीच्या उद्योग विस्तारासाठी जो निधी द्यायचा, त्यावर मर्यादा येते.

अर्थचक्र चालते ते मागणी वाढल्यावर. मागणीच नसेल तर अर्थचक्राचा गाडा रुतून बसतो, हा अगदी प्राथमिक सिध्दांत आहे. म्हणूनच आपल्या अर्थमंत्री निर्मला सीतारामन या मागणी वाढवण्यासाठी वारंवार उपाययोजना करत असतात. पण जेव्हा आयटी क्षेत्र असो की, अन्य कोणतेही क्षेत्र, जेव्हा ले ऑफ होतो तेव्हा तितके कर्मचारी बेरोजगार होतात आणि त्यांची क्रयशक्ती म्हणजे Purchasing Power घटते. मग अर्थचक्राचा गाडा अडतो आणि यात ले ऑफचे मोठे योगदान असते. जरी अमेरिकेसह युरोपीय देशांत ले ऑफ मोठ्या प्रमाणावर होत असले तरीही त्यात हजारो भारतीय आहेत, जे तिकडे स्थायिक झाले आहेत.

# उच्चशिक्षण इंग्रजीतून देणेच विद्यार्थिहिताचे !

व्यवस्थापन, तंत्रज्ञान व वैद्यकीय उच्चशिक्षण संस्थांमध्ये हिंदीचा वापर करण्याची सूचना अलीकडेच केंद्रीय समितीने केली आहे. ती अयोग्य आणि अव्यवहार्य आहे. हिंदीला राष्ट्रभाषेचा दर्जा देण्याच्या प्रयत्नांचाच तो एक भाग आहे. दक्षिणेकडील राज्यांचा हिंदीविरोध जगजाहीर असल्यामुळे यातून भाषिक वाद पेटू शकतो. हे टाळले पाहिजे. तसेच राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातही उच्चशिक्षणात प्रादेशिक भाषांवर भर देण्याची शिफारस आहे. वस्तुतः राष्ट्रीय ज्ञान आयोगाच्या निरीक्षणानुसार शालेय आणि कनिष्ठ महाविद्यालयीन जीवनात इयत्ता बारावीपर्यंत विद्यार्थी किमान तीन भाषा चांगल्या प्रकारे लिहायला, वाचायला, बोलायला शिकू शकतो जसे की मराठी (प्रादेशिक भाषा), हिंदी (सरकारी भाषा ), इंग्रजी (जागतिक भाषा). याशिवाय गरज आणि आवडीनुसार तो भारतातील एखादी अन्य प्रादेशिक भाषा जसे की गुजराती, पंजाबी आणि एखादी परकीय भाषा जसे की जर्मन, फ्रेंचदेखील शिकू शकतो. अशा तऱ्हेने ही भाषिक पंचसूत्री साध्य होऊ शकते. या बहुभाषिकतेचा त्या विद्यार्थ्याला शैक्षणिक, व्यावहारिक आणि व्यावसायिक जीवनातही उपयोग होऊ शकतो. उच्चशिक्षणात इंग्रजीला ‘नेसेसरी इव्हल’ म्हटले जाते, कारण दररोज जगभर अडीच हजार पुस्तके इंग्रजी भाषेत प्रकाशित होतात. विज्ञान, तंत्रज्ञान, व्यवस्थापन, आरोग्य-विज्ञान या विषयांतील संशोधन पत्रिका इंग्रजीत प्रकाशित होण्याचे प्रमाण मोठे आहे. जर्मनी, फ्रान्स, जपान या देशांनीसुध्दा भाषिक दुराग्रह आणि अट्टहास सोडून विज्ञान आणि तंत्रज्ञानासाठी इंग्रजी भाषा वापरण्यास सुरुवात केली आहे.

अमेरिकेत झालेल्या एका सर्वेक्षणात हे दिसून आले आहे की, जगभरातील लष्करात नवीन भरती केलेल्या जवानांना इंग्रजी शिकणे अधिक सोयीस्कर आणि सोपे जाते. त्यामुळे इंग्रजी आत्मसात करणे अजिबात अवघड नाही. इंग्रजीच्या अध्यापनासाठी चांगले शिक्षक आणि अध्ययनासाठी उत्सुक विद्यार्थी तयार करणे तुलनेने अधिक सोपे आहे. अगदी इंग्रजी वर्तमानपत्रे वाचणे, इंग्रजी बातम्या ऐकणे, इंग्रजी चित्रपट पाहाणे असे केले तरी ही भाषा अवगत करता येते. त्यामुळे केवळ भाषिक अट्टहासापायी आणि दुराग्रहापोटी उच्चशिक्षणाचे हिंदीकरण किंवा प्रादेशिक भाषेचा आग्रह अयोग्य आणि अव्यवहार्य ठरेल.

व्यवस्थापकीय, तांत्रिक, वैज्ञानिक, वैद्यकीय संज्ञा इंग्रजीतून हिंदीत किंवा प्रादेशिक भाषांत भाषांतरित करणे आणि विद्यार्थ्यांना समजावून सांगणे क्लिष्ट आणि गुंतागुंतीचे ठरते. त्यातून अर्थबोध न होता दुर्बोधताच निर्माण होते. त्याऐवजी इंग्रजीतच त्या संज्ञा समजणे सोपे जाते. इंग्रजी ही ज्ञानभाषा आहे तसेच ती जागतिक भाषा आहे. मधली पायरी म्हणून सेमी-इंग्लिशचा वापर करता येईल. परंतु उच्चशिक्षणात इंग्रजीला पर्याय नाही. आपला वेळ, श्रम, पैसा आणि संसाधने भाषांतरित पुस्तके तयार करण्यात न दवडता उच्चशिक्षणात संशोधन करण्यासाठी वापरला तर तो सार्थकी लागेल आणि देश प्रगतिपथावर जाईल. त्यामुळे हा सांस्कृतिक आणि भावनिक मुद्दा न करता शास्त्रीय आणि व्यवहार्य कसोटीवर पारखून घेणे अत्यावश्यक ठरते.

समजा अगदी मान्य केले की आम्ही हिंदी किंवा प्रादेशिक भाषेत उच्चशिक्षण घेण्याची सक्ती केलेली नाही, तो एक पर्याय उपलब्ध करून दिला आहे. ज्याला इंग्रजीत उच्चशिक्षण घ्यायचे आहे ते विद्यार्थी तसे घेऊ शकतात. तरीही हा युक्तिवाद फसवा आहे. कारण भाषेच्या अट्टहासापायी बिगरइंग्रजी विद्यार्थी ज्ञानग्रहणात मागे पडू शकतात तसेच पदवी प्राप्त झाल्यानंतर या जागतिकीकरणाच्या युगात इंग्रजीत शिक्षण झालेल्या विद्यार्थ्याला नोकरी, व्यवसाय, व्यापार, उदीम यांच्या असंख्य संधी उपलब्ध होतील आणि हिंदीतून किंवा प्रादेशिक भाषेतून तीच पदवी मिळणारा त्याच्या तुलनेत नक्कीच मागे पडेल. अशा विद्यार्थ्यांत न्यूनगंड निर्माण होऊ शकतो. या मुद्द्यावर विख्यात विनोदी साहित्यिक पु. ल. देशपांडे यांनी रंगविलेल्या ‘नारायण’ या व्यक्तिरेखेचा संदर्भ लक्षात घेण्यासारखा आहे. ‘नारायणाला एखादा मुद्दा अधोरेखित करताना तोडक्यामोडक्या इंग्रजीचा आधार घ्यावासा वाटतो. विशेषतः इंग्रजांपेक्षा इंग्रजीवर त्याचा अधिक राग आहे. कारण या इंग्रजीच्या पेपरनेच नारायणाला मॅट्रिकच्या परीक्षेत वारंवार धक्के दिले होते.’ अशी न्यूनगंडातून आलेली आक्रमकता काय कामाची?



यातील विनोदाचा भाग सोडला तरीही पश्चिम बंगालमधील प्रख्यात शांतिनिकेतन या शिक्षणसंस्थेत विद्यार्थ्यांना बंगालीतच शिक्षण देण्याचा दुराग्रह संस्थेला मागे घ्यावा लागला कारण ‘आमची मुले शिक्षणात मागे पडत आहेत,’ म्हणून पालकांनी मोठे आंदोलन केले आणि संस्थेला इंग्रजीचा स्वीकार करावा लागला.

वरील विवेचनावरून हे स्पष्ट दिसून येईल, की हिंदी किंवा प्रादेशिक भाषेत उच्चशिक्षण देणे व्यवहार्य आणि कालसुसंगत नाही. भविष्यात अशा पद्धतीने शिक्षण घेणारे विद्यार्थीच तो प्रयत्न हाणून पाडतील. काळाची चाके उलटी फिरवून भावी पिढीचे नुकसान करण्याचा अधिकार राज्यकर्त्यांना, शासनव्यवस्थेला, नोकरशाहीला कुणी दिला? असा प्रश्न यानिमित्ताने विचारावासा वाटतो. ‘डबल इंजिन’ सरकारमुळे विद्यार्थ्यांचे ‘डबल नुकसान’ होईल कारण शिक्षण हा केंद्र आणि राज्याच्या सामायिक सूचीतील विषय आहे. इंग्रजीतून उच्चशिक्षण देणे सुलभ, व्यवहार्य, विद्यार्थिहिताचे आहे, यात मुळीच शंका नाही.

## Amazon मध्ये नोकरी द९ण्याच्या

शोधात असलेल्यांना याचा बसला फटका पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांच्या तपासादरम्यान त्यांना असे आढळून आले की, चिनी सायबर गुन्हेगारांनी वर्क फॉर्म होम (work from home jobs) किंवा पार्ट टाइम नोकरी शोधणाऱ्या लोकांची फसवणूक करण्यासाठी एक मॉड्यूल तयार केले आहे. पार्ट टाइम नोकरीच्या शोधात असलेल्या एका महिलेची 1.18 लाख रुपयांची फसवणूक करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले. असे म्हटले जात आहे की, या सायबर ठगांनी लोकांची फसवणूक करण्यासाठी टेलिग्राम आयडीचा वापर केला आहे. हा आयडी बीजिंग चीनमधून कार्यरत होता. ज्या व्हॉट्सअॅप नंबरवरून लोकांना ॲमेझॉन साइटवर गुंतवणूक करण्यास सांगण्यात आले होते तोही भारताबाहेरचा होता. मिळालेल्या माहितीनुसार, दिल्ली पोलिसांना एक तक्रार प्राप्त झाली होती. ज्यामध्ये एका महिलेने तक्रार दाखल केली होती की, काही अज्ञात घोटाळेबाजांनी Amazon मध्ये ऑनलाइन पार्ट टाइम नोकरी देण्याच्या नावाखाली तिची 1.18 लाख रुपयांची फसवणूक केली आहे. तक्रारीत महिलेने म्हटले आहे की, हा एक मोठी प्लान सुरू आहे, जो काही लोक ॲमेझॉन कंपनीच्या नावाने करत आहेत. वस्तुस्थिती तपासल्यानंतर पोलिसांनी फसवणुकीचा गुन्हा दाखल केला.

Amazon सारखी वेबसाइट डिझाइन

नोकरी शोधणाऱ्यांना चेतावणी देताना दिल्ली पोलीस म्हणाले की, हे लोक वेबसाइट्स अशा प्रकारे डिझाइन करतात की ते वास्तविक ॲमेझॉन वेबसाइटसारखे दिसते. इन्स्टाग्राम, फेसबुक आणि इतर सोशल मीडिया वेबसाइटवरही अशा बनावट वेबसाइट्सचा मोठ्या प्रमाणावर प्रचार केला जातो. घोटाळेबाज पीडितांना चांगले पैसे कमावणाऱ्या कर्म चाऱ्यांचे बनावट स्क्रीनशॉटही दाखवतात.

## काय सांगता! तब्बल ८२ वर्षांचे आजोबा

साहित्य, असा 6 लाख 42 हजार 905 रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. तर या प्रकरणी एका 82 वर्षीय वृद्धाविरुद्ध सिटी चौक ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. शंकर नारायण आचार्य (वय 82 वर्षे, रा. सिद्धिविनायक गणपती मंदिराजवळ, दगडगल्ली, कुंभारवाडा, औरंगपुरा) असे आरोपीचे नाव आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, गुन्हे शाखेचे निरीक्षक अविनाश आघाव यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक कल्याण शेळके यांचे पथक शहरात गस्तीवर होते. दरम्यान रेकॉर्डवरील गुन्हेगार असलेला शंकर नारायण आचार्य आपल्या घरी तिसऱ्या मजल्यावर मोठ्याप्रमाणात गावठी दारू बनवत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. माहिती मिळताच शेळके यांच्यासह उपनिरीक्षक गायकवाड, अंमलदार शेख हबीब, विजय निकम, संजय मुळे, संजय गावंडे, राजेंद्र साळुंके, अनिता त्रिभुवन आदींचे पथक आचार्यच्या घराजवळ गेले. दरम्यान पंचांना बोलावून घेत पथकाने त्याच्या घरावर छापा मारला. पोलिसांनी अशी केली कारवाई... दरम्यान पोलिसांनी केलेल्या या कारवाईत एकूण पंधरा ड्रम भरून दारू जप्त केली आहे. ज्यात 50 लिटर मिश्रण असलेली 100 लिटरची स्टीलची टाकी, 1400 लिटर दारू असलेले 200 लिटरचे सात ड्रम, चारशे लिटर दारू असलेले 100 लिटरचे चार ड्रम, चारशे लिटर मिश्रण असलेले चार ड्रम, दोन लोखंडी शेगड्या (भट्ट्या), दोन सिलिंडर, इलेक्ट्रिक मोटार, एक किलो सोडियम बायकार्बोनेट, गूळ, पावडरचे पाकीट, सहा किलो नवसागर, प्लास्टिकच्या बकेट, टोपले, नरसाळे, गावठी दारूचे मिश्रण ढवळण्यासाठी साडेचार फूट लांबीचा बांबू आदी साडेसहा लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. साडेसहा लाखांचा मुद्देमाल जप्त! पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार आचार्य हा रेकॉर्डवरील गुन्हेगार आहे. तो फार पूर्वीपासून गावठी दारूचा अड्डा चालवित आहे. त्याच्या अड्ड्यावर यापूर्वीही पोलिसांनी छापा मारलेला आहे. मात्र वयाचे 82 वर्षे झाले असताना देखील त्याने गुन्हेगारी वृत्ती अजूनही सोडलेले नाही. दरम्यान आता पुन्हा एकदा त्याच्या घरावर छापा मारत गुन्हे शाखेच्या पथकाने साडेसहा लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

## 2 फेब्रुवारीला मुंबई महापालिकेचा

मुंबई महापालिका निवडणुकीच्या ऐन मोक्यावर सादर होणार असल्याने त्यात आरोग्य, शिक्षण, रस्ते यावर भरीव तरतूदीची घोषणा होण्याची शक्यता आहे. यावेळी प्रत्यक्ष मुंबईकरांच्या पदरी काय पडणार हे देखील या अर्थसंकल्पातून स्पष्ट होणार आहे. यात आर्थिक सक्षमीकरणासाठी पालिका कोणत्या उपाययोजनांवर भर देणार याकडेही सर्वांचं लक्ष लागून आहे. गेल्या वर्षीच्या मुंबई महापालिकेच्या अर्थसंकल्पात आरोग्या सेवांवर 1800 कोटींची वाढ करत एकूण 6624.41 कोटींची तरतूद करण्यात आली होती. यंदाही ही वाढ अपेक्षित आहे. गेल्या वर्षीच्या 45949.21 कोटींच्या अर्थसंकल्पात यंदा सुमारे साडेचार हजार कोटीची वाढ होण्याची शक्यता आहे. या आगामी महापालिका निवडणूक डोळयासमोर ठेवत कोणत्या मोठ्या प्रकल्पांच घोषणा होते याकडे सर्व लक्ष ठेवून आहेत. सध्या मुंबई महानगरपालिकेचा कारभार नगरसेवक आणि प्रशासनाच्या माध्यमातून चालवण्यात येत आहे. तब्बल 38 वर्षांनंतर मुंबई महापालिकेचा कारभार प्रशासकाच्या माध्यमातून चालवला जात आहे. प्रशासकाची नियुक्ती ही आगामी सार्व त्रिक निवडणुकीनंतर होणाऱ्या महापालिकेच्या पहिल्या सभेच्या तारखेपर्यंत लागू राहील. 7 मार्चनंतर मुंबईचा संपूर्ण कारभार पालिकेच्या माध्यमातून चालवण्यात येत आहे.

## क्राईम पेट्रोल पाहून

करून पूजेच्या बहाण्याने जैन मंदिरात रेकी केली होती. चेहऱ्यावर मास्क लावून सोन्याचा ऐवज नेत असल्याची कबुली आरोपीने दिली. तो चांदीच्या पूजेचे साहित्य देवळातून लंपास करून दुकानदाराला विकायचा. आरोपी मिळालेल्या पैशातून जुगार खेळायचा. दिंडोशी पोलीस अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, हा आरोपी जैन समाजाच्या धार्मिक पोशाखात येऊन दररोज 5 मंदिरांची रेकी करायचा आणि संधी मिळेल तिथे सामान चोरायचा. जैन पुजाऱ्याच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल करून आरोपीला अटक करून त्याच्याकडून चोरीची सोन्याची भांडी जप्त केली. सीसीटीव्हीत कैद झाला आरोपी : मालाडच्या जैन मंदिरातील सीसीटीव्ही फुटेजमध्ये आरोपी जैन धर्मा च्या वेशात मंदिरात आल्याचे स्पष्टपणे दिसत आहे. पूजा करण्यासोबतच रेकी करत आहे. आरोपीच्या हातात सोन्याचे ताट आणि वाटी आहे. संधी मिळताच तो सोन्याचा ताट घेऊन मंदिराबाहेर पडला. त्याच दुसऱ्या घटनेत आरोपी घरातून स्कूटरवरून उतरून पायी मंदिराच्या परिसरात पोहोचायचा आणि चोरी केल्यानंतर तो सीसीटीव्ही कॅमेरे नसलेले मार्ग निवडायचा.पोलिसांकडून मंदिर परिसराची झडती : 23 जानेवारी रोजी जैन पुजारी धीरज लाल शहा यांनी दिंडोशी पोलिसांत तक्रार दिली होती की, ते सकाळी 160 ग्रॅम सोन्याचे ताट घेऊन पूजा करण्यासाठी मंदिरात गेले असता तेथून त्यांचे सोन्याचे ताट गायब झाले आहे. या धक्कादायक चोरीप्रकरणी दिंडोशी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस उपनिरीक्षक जीवन खरात यांच्या सूचनेवरून पोलिसांनी मिळून मंदिराच्या आजूबाजूच्या परिसराची झडती घेतली. आरोपीने केलेल्या पोशाखामुळे पोलिसांनी आरोपीची ओळख पटवण्यासाठी 93 हून अधिक सीसीटीव्ही फुटेज तपासले. कारण जैन धर्मीय त्याच वेषात त्यांच्या मंदिरात म्हणजे देरासरमध्ये जातात. जैन समाजाच्या वेशात आरोपी पूजेच्या बहाण्याने जैन मंदिरात प्रवेश करतो आणि चोरी करून पळून जातो हे सीसीटीव्ही फुटेजवरूनच उघड झाले आहे.आरोपी जुगाराचा शौकीन : सीसीटीव्ही फुटेजवरून असेही समोर आले आहे की, आरोपी वेशात दररोज 5 जैन मंदिरात जायचा आणि रेकी करून तेथून पूजेचे ताट आणि चांदीची भांडी चोरून विकत असे. किरकोळ चोरी असल्याने मंदिरातील लोकांनी कधीही चोरीची तक्रार दाखल केली नाही. भारत सुखराज दोशी (53, रा. रामचंद्र लेन, मालाड) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून, तो जुगार खेळण्याचा शौकीन होता. पोलिसांनी आरोपींकडून 160 ग्रॅम वजनाच्या सोन्याच्या वस्तू आणि एक स्कूटर, असा एकूण 5 लाख 30 हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

## ठाण्यात आठवीच्या विद्यार्थिनीने

संपवली. ठाण्यातील पाचपाखाडीतील सोसायटीमधील ६०३ क्रमांकाच्या सदनिकेतील ही विद्यार्थिनी असून बुधवारी रात्री तिने ही आत्महत्या केल्याचे उघड झाले. बुधवारी ११ जानेवारी रोजी रात्री ९.४० वाजण्याच्या सुमारास एका १३ वर्षीय विद्यार्थिनीने घरातील बेडरूमच्या सिलिंग फॅनला नायलॉनची दोरी बांधून आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली होती. ही मयत विद्यार्थिनी घोडबंदर रोड येथील श्री माँ विद्यालयात इयत्ता आठवीमध्ये शिकत होती. हा प्रकार कुटुंबीयांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी तिला तातडीने जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. या घटनेची माहिती मिळताच वरिष्ठ पोलिस निरीक्षक जितेंद्र राठोड, विजय मुतडक आणि उपनिरीक्षक पी. ए. लहाने आदींनी भेट देऊन घटनास्थळी पाहणी केली. यावेळी पोलिसांच्या हाती कुठलेही पुरावे लागले नाही. मुलीने आत्महत्या करण्यापूर्वी कुठलीही सूचना किंवा सुसाईड नोट लिहलेले आढळून आली नसल्याने तरुणीने ही आत्महत्या का केली याचे कारण अद्याप अस्पष्ट आहे. मात्र या तरुणीने नैराश्यातून आत्महत्या केली असावी असा कयास पोलिसांनी व्यक्त केला असून पुढील तपास सुरू आहे.

## एटीएम कार्ड ॲक्टिव्ह करण्याच्या

सेंटरमध्ये एटीएम कार्ड अॅक्टिव्हेट करत असताना ते ॲक्टिव्हेट होत नव्हते. याचदरम्यान त्यांच्या मागे उभा असलेल्या ठगाने दुसऱ्या एटीएममध्ये त्यांना नेले. दुसरा ठग टॅक्सी घेऊन बाहेर उभा होताच. याच टॅक्सीतून दुसऱ्या एटीएम सेंटरमध्ये नेऊन एटीएम कार्ड ॲक्टिव्हेट केले. नंतर हातचलाखी करुन भामट्यांनी महिलेला गंडा घालून तिचे एटीएम स्वतःजवळ ठेऊन तिला दुसरेच कार्ड दिले. या सर्व प्रकार एसबीआयच्या एटीएम सेंटरमध्ये घडला. नंतर महिला घरी गेल्यानंतर तिच्या बँक खात्यातून पैसे वजा झाल्याचा मेसेज आला.15 हजारांची रोकड जप्त : बँकेच्या आत तसेच एटीएम केंद्राबाहेर सीसीटीव्हीची तपासणी केली जात आहे. तपासात आरोपींनी वापरलेली काळी पिवळी टॅक्सी सापडली असून टॅक्सी चालकाने दोन्ही आरोपींना कुठे सोडले ते सांगितले. पोलिसांनी त्या भागात दोन्ही आरोपींचा शोध सुरू केला असता दोन्ही गुंड एका लॉजमध्ये राहत असल्याचे आढळून आले. पोलिसांनी सापळा रचून दोन्ही आरोपींना अटक केली आहे. या दोघांकडून विविध 5 बँकांचे डमी एटीएम कार्ड, 2 मोबाईल फोन, 15 हजारांची रोकड जप्त करण्यात आली आहे. दोन्ही आरोपी सुशिक्षित असल्याची माहिती समोर आली आहे. त्यांच्यावर 5 हून अधिक फसवणुकीचे गुन्हे दाखल आहेत. मालाड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवी अदाणे, मालाड विभागाच्या सहाय्यक पोलीस आयुक्त रेणुका बागडे यांच्या मार्गदर्शनानुसार गुन्हे विभागाचे पोलीस निरीक्षक जाधव यांच्या पथकातील सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवाजी शिंदे यांच्या पथकात कॉन्स्टेबल, फर्नांडीज, चुंगीडियार, महाडिक, गायकवाड, पाईकराव वाघ आदी सहभागी झाले.

## मुंबई विमानतळावर 9.5 किलोचे सोने जप्त

किलोचे सोने जप्त केले आहे. ज्याची बाजारातील किंमत 4.75 कोटी रुपये असल्याचे सांगितले जात आहे. तस्करीचे 2.99 कोटी रुपयांचे 6000 ग्रॅम सोने घेऊन दुबईहून आलेल्या दोन अझरबैजान नागरिकांना अटक करण्यात आली असल्याची माहिती सीमाशुल्क विभागाने दिली आहे.

## चक्क भाच्यानंच दिली मामा-मामीला लुटण्याची

23 जानेवारीला घडली होती. दरम्यान, यावेळी श्रीपतराव पाटील आणि त्यांची पत्नी चंद्रकलाबाई श्रीपतराव पाटील यांचे हात-पाय आणि तोंड कपड्याने बांधून, चंद्रकलाबाई यांची हत्या करण्यात आली होती. तसेच, चोरट्यांनी सोन्या-चांदीचा 3 लाख 89 हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला होता. याप्रकरणी देगलूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. दरम्यान, या घटनेने जिल्ह्यात खळबळ उडाली होती. तर पोलिसांसमोर तपासाचे आव्हान देखील होते. त्यामुळे वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सोहन माछरे यांची टीम आणि स्थानिक गुन्हे शाखेसह मुखेड, मरखेल, मुक्रमाबाद पोलिसांचे शोधपथक तयार करण्यात आले होते. यावेळी तपास सुरू असतानाच पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहिती अधारे सीसीटीव्हीमधील आरोपींची ओळख पटली. त्यामुळे पोलिसांनी ओळख पटताच आरोपींचा शोध घेऊन त्यांना ताब्यात घेतले.

## वर्दळीच्या रस्त्यावरच एका तरुणावर दोन हल्लेखोरांचा चाकू हल्ला



ठाणे : बाजारपेठ असलेल्या वर्दळीच्या ठिकाणी शेकडो नागरिकांच्या समोर हल्लेखोर तीक्ष्ण हत्याराने तरुणावर हल्ला करत असतानाच विठ्ठलवाडी पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल होऊन एका हल्लेखोराला ताब्यात घेतले. मात्र गेल्या काही महिन्यांपासून विठ्ठलवाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत कायदा आणि सुव्यवस्था पूर्णपणे ढासळली असल्याचे या घटनेतून स्पष्ट झाले.

हल्ल्याचा व्हिडीओ व्हायरल : हल्लेखोर अनिल सावंत आणि त्याच्या साथीदाराने काल रात्रीच्या सुमारास उल्हासनगर रेल्वे स्थानकाच्या समोरील रस्त्यावर एका तरुणावर अचानक चाकूहल्ला केला. तरुणाने जीव वाचविण्यासाठी रेल्वे स्थानकाच्या दिशेने पळ काढला. मात्र, दोन्ही हल्लेखोरांनी त्याचा पाठलाग करत त्याला पुन्हा गाठले. त्यानंतर त्याच्या अंगातील शर्ट फाडून त्याच्यावर धारदार चाकूने हल्ला केला. सध्या उल्हासनगरच्या रेल्वे स्थानक परिसरातील तरुणावर चाकू हल्ल्याचा व्हिडिओ व्हायरल होत आहे. हल्ल्याची माहिती पोलिसांना मिळताच त्यांनी एका हल्लेखोराला घटनास्थळी ताब्यात घेतले. मात्र दुसरा हल्लेखोर पळून गेला. चाकू हल्लात जखमी झालेला तरुण भयभीत झाल्याने तो तरुण पोलीस ठाण्यात तक्रार करण्यासाठी आला नसल्याने त्याचे नाव समजू शकले नाही.

आरोपीविरुद्ध थातुरमातूर कारवाई : ताब्यात घेतलेल्या हल्लेखोर सावंतवर विठ्ठलवाडी पोलिसांनी त्याला अटक न करता, केवळ प्रतिबंधात्मक कारवाई म्हणून पोलीस कायद्या १५१ प्रमाणे कारवाई करून त्याला सोडून दिले. परंतु, गुन्हेगार प्रवृत्तीच्या हल्लेखोराच्या हातात स्पष्टपणे धारधार हत्यार दिसत असून भर रस्त्यावर दहशत माजवत असताना देखील पोलिसांनी याच्या विरोधात आर्म ॲक्ट आणि दहशत माजवण्याचा गुन्हा का दाखल केला नाही? तसेच अशा गुन्हेगारांना पोलीस पाठीशी का घालतात? असे अनेक प्रश्न अनुत्तरीत आहेत. या घटनेमुळे पुन्हा एकदा उल्हासनगर शहरात कायदा सुव्यवस्था कुठे आहे?

असा गंभीर प्रश्न निर्मा ण झाला आहे. आरोपी बड्या नेत्याचा कार्यकर्ता ? सूत्राने दिलेल्या माहितीनुसार पोलिसांनी ताब्यात घेऊन सोडलेला हल्लेखोर सावंत हा उल्हासनगर मधील शिंदे गटाच्या बड्या नेत्याचा खास कार्यकर्ता असल्याने त्यासाठी पोलिसांवर त्या बड्या नेत्याने दबाव आणल्याची चर्चा आहे. याप्रकरणी विठ्ठलवाडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय गायकवाड यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी कॅमेऱ्यासमोर बोलण्यास नकार दिला. तसेच तक्रारदार तरुण हा पोलीस ठाण्यात तक्रार देण्यासाठी आला नसल्याचे सांगून या हल्ल्यात कोणी जखमी नसून हल्लेखोर आणि जखमी तरुण हे दोघेही मित्र असल्याचे त्यांनी सांगितले.

## बायको गेली माहेरी, त्याने व्हिडीओ कॉल केला अन् जीवन संपवलं





औरंगाबाद शहरात एक धक्कादायक घटना समोर आली असून, एका तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार मुकुंदवाडीतील शाहूनगरातील 29 वर्षीय रिक्षा चालकाने मावसभावाला व्हिडीओ कॉल करत गळफास घेतला. ही घटना शनिवारी उघडकीस आली आहे. अमोल उत्तम खाडे (रा.शाहूनगर, मुकुंदवाडी) असे मृताचे नाव आहे. या घटनेची नोंद मुकुंदवाडी पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, अमोलचे साडेतीन वर्षांपूर्वी लग्न झाले होते. त्याला अडीच वर्षांची मुलगी असून, पत्नी सहा महिन्यांपासून माहेरी आहे. दरम्यान शनिवारी अमोलने राहत असलेल्या भाड्याच्या घरातून सायंकाळी ज्योतिनगर परिसरात राहणाऱ्या आपल्या मावसभावाला व्हिडीओ कॉल केला. या कॉलवर बोलता असतानाच अमोलने आत्महत्या करत असल्याचे सांगितले. आपल्या मावस भावासोबत व्हिडिओ कॉलवर बोलत असताना अमोल किचन ओट्याजवळ होता. तिथे नायलॉनची दोरी लटकलेली असून फास त्याने गळयात घातल्याचे व्हिडिओ कॉलमध्ये रेकोर्ड झाले आहे. यावेळी अमोलला त्याच्या मावसभावाने समजावण्याचा प्रयत्न केला, परंतु तोपर्यंत अमोलने गळफास घेतला होता. दरम्यान नातेवाईक, मित्रांनी त्याला रुग्णालयात दाखल केले असता, डॉक्टरांनी अमोलला तपासून मयत घोषित केले. पुढील तपास मुकुंदवाडी पोलिस करत आहेत. नातलगांच्या म्हणण्यानुसार, पत्नी नांदायला येत नसल्याने अमोलने आत्महत्या केली असावी. पण पोलिसांकडून याबाबत अधिक तपास करण्यात येत आहे. भावाने समजवण्याचा प्रयत्न केला... अमोलने राहत असलेल्या भाड्याच्या घरातून सायंकाळी ज्योतीनगर परिसरात राहणाऱ्या आपल्या मावसभावाला व्हिडीओ कॉल केला. दरम्यान यावेळी त्याने घरात लटकवलेला गळफास देखील दाखवला. यावेळी अमोलला त्याच्या मावसभावाने समजावण्याचा प्रयत्न केला. तसेच असे टोकाचे पाऊल उचलू नको असे सांगण्याचा प्रयत्न देखील केला. पण तोपर्यंत अमोलने गळफास घेतला होता. याची माहिती अमोलच्या मावसभावाने तत्काळ इतर नातेवाईकांना दिली. पण अमोलला रुग्णालयात घेऊन गेल्यावर डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. पोलिसात नोंद... अमोलने राहत असलेल्या भाड्याच्या घरात आत्महत्या केल्याची महिती त्याच्या मावसभावाने इतर नातेवाईकांना दिली. दरम्यान याची माहिती मुकुंदवाडी पोलिसांना मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला आहे. तर अमोलने आत्महत्या का केली याचा तपास देखील पोलिसांकडून करण्यात येत आहे.

## इंस्टाग्रामवरील मित्रानेच केला 16 वर्षीय अल्पवयीन मुलीवर अत्याचार; दोघांना अटक, तिसरा फरार



गोंदिया शहरातील एका 16 वर्षीय अल्पवयीन (Minor Girl) मुलीशी इंस्टाग्रामवर झालेल्या ओळखीनंतर दोघांनी वेगवेगळ्या ठिकाणी नेवून तिच्यावर अत्याचार केल्याचे प्रकरण गोंदियात उघडकीस आले आहे. यात गोंदिया पोलिसांनी दोघांना अटक केली असून तिसऱ्या तरुण फरार असून पोलीस त्याचा शोध घेत आहे. या घटनेने गोंदिया जिल्हा हादरून गेला आहे.पीडित मुलीगी ही इंस्टाग्रामवर तथा सोशल मीडियावर ॲक्टिव्ह असून त्यातून तिची तीन तरूनांसोबत ओळखी झाल्यानंतर त्यांची मैत्री वाढली. यातून दोघांनी गैरफायदा उचलत तिला वेगवेगळया ठिकाणी नेत अत्याचार केला. तर एकाने तिला बाहेर नेले होते. याप्रकरणी तरुणीने दाखल केलेल्या तक्रारीवरून गोंदिया सिटी पोलिसांनी तीन तरूनांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. यात 27 वर्षीय प्रशात मोटघरे, 23 वर्षीय सौरभ मेश्राम याला अटक करीत न्यायालयात हजर केले असता 10 फेब्रुवारीपर्यंत न्यायालयीन कोठडीत दोघांची रवानगी करण्यात आली आहे. तर तिसरा आरोपी फरार झाला असून गोंदिया पोलीस त्याचा शोध घेत आहे. मुलीवर दोन ठिकाणी अत्याचार झाल्याच्या बाबीला ठाणेदार सूर्यवंशी यांनी दुजोरा दिला असून तिच्यावर सामूहिक अत्याचार नसून मैत्रीतून हे कृत्य केल्याची बाब समोर आली आहे.

लातूरमध्ये गुंगीचे औषध पाजून 16 वर्षीय मुलीवर बलात्कार लातूर जिल्ह्यातही (Latur) 22 जानेवारी रोजी एका 16 वर्षीय अल्पवयीन मुलीवर बलात्कार झाल्याची घटना घडली होती. शहरातील महिला आणि बालविकास विभागाच्या एका निरीक्षण बालगृहातील अल्पवयीन मुलीला गुंगीचे औषध पाजून तिच्यावर बलात्कार करण्यात आला आहे. या घटनेनंतर एमआयडीसी पोलीस ठाण्यात मुलीच्या मैत्रिणीसह पाच जणांविरुद्ध भारतीय दंड विधान आणि पोक्सो कायद्यानुसार गुन्हा दाखल झाला. यातील एका महिलेला अटक देखील करण्यात आली. याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, निरीक्षण बालगृहातील एक मुलगी एका महविद्यालयात प्रथम वर्षात शिक्षण घेत असून, तिची आठवीपासूनची एक मैत्रीण तिच्याच सोबत शिक्षण घेत आहे.

## नागपुरात पोराचे राक्षसी कृत्य; दारूसाठी पैसे न दिल्यानं आईचाच केला खून




दारूच्या व्यसनात दुसरे काही सूचत नाही. व्यसन पूर्ण करण्यासाठी व्यक्ती कोणतीही पातळी गाठू शकतो, अशीच एक घटना नागपुरात घडली आहे. रक्ताच्या नात्यांमध्येदेखील द्वेष, विखार वाढत चालला आहे आणि यातूनच अनेकदा गुन्हेदेखील घडताना दिसून येतात. नागपुरातील यशोधरानगरात रविवारचा दिवस थरकाप उडविणारा ठरला. बेरोजगार आरोपीला स्वतःच्या आईपेक्षा नशा देणारी दारू जास्त महत्त्वाची वाटली आणि आईने दारुसाठी पैसे न दिल्याने संतापून त्याने जन्मदात्रीवरच विळयाने वार केले. अक्षरशः राक्षसी कृत्य करत त्याने आईचाच गळा चिरत तिचा खून केला. त्यानंतर दारुची नशा उतरल्यावर त्याने स्वतःच पोलीस ठाणे गाठलं आणि केलेल्या कृत्याची माहिती पोलिसांना दिली. गोविंद संतराम काटकर (वय 32, वनदेवीनगर) असे आरोपीचे नाव असून विमलाबाई संतराम काटकर (वय 60) असे दुर्दैवी मृत आईचे नाव आहे. आरोपी गोविंदला दारूचे व्यसन असून त्याच्या या सवयीमुळे कुणीही त्याला जास्त दिवस कामावर ठेवत नाही. काही वेळा मजूर म्हणूनही तो काम करतो. त्याच्या कुटुंबात आईशिवाय मोठा भाऊ आहे. मोठा भाऊ सुमारे दहा वर्षांपासून पत्नी आणि मुलांसह कळमना येथे राहतो. दारूच्या व्यसनामुळे गोविंदला काही दिवस काम मिळत नव्हते. तो आई विमलाबाई यांच्याकडे दारू पिण्यासाठी पैसे मागायचा. पैसे न दिल्याने गोविंद त्याच्या आईलाही मारहाण करायचा. रविवारी सकाळी दहा वाजता गोविंदने विमलाबाईंकडे दारू पिण्यासाठी पैसे मागितले. सुरुवातीला आईने त्याला काहीच प्रतिसाद दिला नाही. गोविंदकडून सतत छळ होत असल्याने त्यांनी घरच्या आर्थिक परिस्थितीचा हवाला देत पैसे देण्यास नकार दिला. त्यामुळे गोविंदला राग अनावर झाला आणि त्याने घरातील विळा घेत आईकडे धाव घेतली. त्याने विळयाने आईचा गळा चिरला. यात विमलाबाई या रक्ताच्या थारोळ्यात पडला आणि आचके देत त्यांचा जागीच मृत्यू झाला.अनेक दिवसांपासून देत होता त्रास गोविंदच्या दारूच्या व्यसनामुळे त्याला कोणी नियमित कामही देत नव्हते. त्याच्या वडिलांचे 12 वर्षांपूर्वी निधन झाले होते आणि तेव्हापासून त्याने आईला त्रास देणे सुरू केले होते. पैशांसाठी तो सातत्याने विमलाबाईंना त्रास देत असल्याचे माहिती शेजारच्यांना देखील होती. अनेकांनी त्यांची समजूत घालण्याचादेखील प्रयत्न केला होता. मात्र त्याला दारुसमोर काहीच सुचले नाही. दारुची झिंग उतरल्यावर स्वतः पोहोचला ठाण्यात आईची हत्या केल्यावर गोविंद थोड्यावेळाने घराबाहेर निघाला. दारूच्या नशेत तो दिवसभर भटकला. सायंकाळी पाचच्या सुमारास नशा उतरल्यावर त्याला नेमके काय करून ठेवले हे लक्षात आले. त्याने स्वतःच यशोधरानगर पोलीस ठाणे गाठले. तिथे कर्तव्यावर असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांना त्याने खून केल्याचे सांगितले. एकूण प्रकार ऐकल्यावर त्यांनादेखील धक्काच बसला, त्वरित वरिष्ठ अधिकाऱ्यांना माहिती देण्यात आली. पोलिसांनी गोविंदविरोधात गुन्हा नोंदवत त्याला अटक केली आहे. रात्री उशिरापर्यंत त्याची चौकशी सुरू होती.

## चार वषार्पासून पगार थकला, पीएसआयने उचललं टोकाचं पाऊल, मुंबईतील घटनेमुळे खळबळ



मुंबई : मुंबईत एक धक्कादायक घटना समोर आली आहे. चार वर्षांपासून पगार थकल्यामुळे एका पोलिस उपनिरीक्षकाने गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. प्रकाश काशिनाथ थेतले असे आत्महत्या केलेल्या पीएसआयचं नाव आहे. या प्रकरणी प्राथमिक अहवालावरून गुन्हा दाखल केला असून अधिक तपास सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, प्रकाश काशीराम हे मुंबईतील चुनाभट्टी भागात राहात होते. त्यांना गेल्या चार वर्षांपासून पगार मिळत नव्हता. ते नवी मुंबईतील कोपरखैरणे पोलिस ठाण्यात कार्यरत होते. पण काही महिन्यांपूर्वी मुंबईत बदलीवर आले होते. गेल्या अनेक महिन्यांपासून ते टीबीच्या आजाराने त्रस्त होते. उपचारासाठी पैसे जमा करण्यात अपयश आल्यामुळे त्यांनी राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. आत्महत्येपूर्वी कुटुंबीयांना मेसेज आत्महत्येपूर्वी प्रकाश काशीराम यांनी त्यांच्या कुटुंबीयांना काळजी घ्या असा मेसेज पाठवला आणि नंतर आपले जीवन संपवले. दरम्यान, या घटनेने एकच खळबळ उडाली असून घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन मुंबई पोलिसांनी याबाबत अधिक तपास सुरू केला आहे.

प्रकाश काशिनाथ थेतले (वय 38 ) यांचा मागील चार वर्षांपासून पगार बंद होता. मे 2022 पासून त्यांना टीबी आजाराने ग्रासले होते. त्यामुळे त्यांच्यावर उपचार सुरू होते. थेतले यांना दारूचे व्यसन होते. शिवाय ते नेहमी गैरहजर राहत होते. कोपर खैने पोलिस ठाण्यातून 29 नोव्हेंबर 2022 रोजी बदलीवर मुंबई शहर येथे बदलून आले होते. आज रात्री म्हणजे 29 जानेवारी रोजी रात्री चुनाभट्टी येथील त्यांच्या राहत्या घरी असताना कुटुंबियांना take care असा मेसेज करून गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. आत्महत्येपूर्वी त्यांनी एक चिठ्ठी देखील लिहिली होती. यात कामात वरिष्ठांचे सहकार्य लाभले असा उल्लेख असल्याची माहिती चुनाभट्टी पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक श्री देसाई यांनी दिली. या घटनेनंतर त्यांच्या कुटुंबीयांना मदत स्वरूपात म्हणून 32000 रूपये पुरविण्यात आली आल्याची माहिती मिळाली आहे.

## Instagram वरील एक पोस्ट बघणं महिलेला पडलं महागात जॉब लावून देण्याच्या बहाण्याने केलं धक्कादायक कृत्य




मुंबई, 28 जानेवारी: सोशल मीडियाचा वापर करून नोकरी देण्याच्या बहाण्यानं एका महिलेला लाखो रुपयांचा गंडा घातल्याचा प्रकार समोर आला आहे. मुंबईमध्ये हा प्रकार घडलाय. स्वतःची फसवणूक झाल्याचं संबंधित महिलेच्या लक्षात येताच, तिनं चितळसर पोलीस ठाण्यात जाऊन फिर्या द दिलीय. त्यावरून पोलिसांनी अनोळखी व्यक्तींविरुद्ध फसवणुकीचा आणि माहिती तंत्रज्ञान कायद्याच्या संबंधित कलमांतर्गत गुन्हा दाखल केलाय. 'झी न्यूज हिंदी'ने याबाबत वृत्त दिलंय. आजकाल सोशल मीडिया प्लॅटफॉर्म फक्त फोटो आणि मेसेज शेअर करण्यापुरता मर्या दितनाही. तर आता फेसबुक, ट्विटर, इन्स्टाग्राम, व्हॉट्सॲपसारखे प्लॅटफॉर्म आभासी केंद्र बनले आहेत. व्यवसाय, नोकरी शोधणं, पैसे मिळवणं यासाठीदेखील हे प्लॅटफॉर्म वापरले जातात. मात्र, आता याचाच फायदा गुन्हेगार घेऊ लागलेत. सोशल मीडियाचा वापर करताना एक छोटीशी चूक महागात पडल्याची अनेक उदाहरणं आता समोर येतात. नोकरी शोधणाऱ्यांसाठीसुद्धा हे प्लॅटफॉर्म आता सुरक्षित राहिलेले नाहीत. येथे नोकऱ्या देण्याच्या नावाखाली सायबर गुन्हेगार लोकांकडून पैसे घेऊन गायब होत आहेत. असाच एक प्रकार नुकताच समोर आलाय. मुंबईतील एका महिलेला नोकरी देण्याच्या बहाण्यानं लाखो रुपयांचा गंडा घालण्यात आलाय. इन्स्टाग्रामवरची पोस्ट बघायचा मोह झाला अन्... ठाणे येथील एका 26 वर्षीय महिलेची ऑनलाइन फसवणूक करण्यात आली. तिला नोकरी देण्याच्या नावाखाली 5,38,173 रुपयांना गंडा घालण्यात आला. पीटीआयच्या वृत्तानुसार, संबंधित महिला इन्स्टाग्रामवर स्क्रोल करत असताना एका पेजवर तिनं नोकरीची जाहिरात पाहिली. त्यानंतर तिनं संबंधित नोकरीच्या जाहिरातीवर क्लिक केले. त्यामुळे ती इन्स्टाग्रामच्या पेजवरून एका वेबसाइटवर गेली. महिलेनं वेबसाइटवरील सूचनांचं पालन करीत सर्व तपशील भरले. त्यानंतर महिलेला ऑनलाइन पेमेंट करण्यास सांगण्यात आले. विशेष म्हणजे, संबंधित महिलेनं या वेबसाइटवर 6 दिवसांत एकूण 5,38,173 रुपये भरले. इतके पैसे दिल्यानंतर महिलेनं नोकरीसाठी संबंधित वेबसाइटवर असलेल्या नंबरवर फोन केला, पण तिला कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. अखेर स्वतःची फसवणूक झाल्याचं लक्षात येताच, संबंधित महिलेनं पोलीस स्टेशन गाठून फिर्या द दिली. यावरून पोलिसांनी अनोळखी व्यक्तीच्या विरोधात गुन्हा दाखल केला असून तपास सुरू केला आहे. गुगलवर कस्टमर केअर नंबर शोधत असाल तर सावधान! होऊ शकते फसवणूक

फसवणूक टाळण्यासाठी अशी घ्या काळजी

- जेव्हा तुम्ही सोशल मीडियावर नोकरीची पोस्ट पाहाल, तेव्हा प्रथम संबंधित कंपनीची अधिकृत वेबसाइट शोधा. तसंच पोस्ट खरी आहे की नाही, ते तपासा.
- सायबर गुन्हेगार सोशल मीडिया प्लॅटफॉर्म वर क्लिक बाइट हेडलाइन देऊन लोकांना आमिष दाखवतात आणि पैसे कमवतात, हे लक्षात ठेवा.
- कंपनीचे नाव ऑनलाइन शोधा. ही कंपनी अस्तित्वात आहे किंवा नाही, हे तपासा. कंपनीच्या अधिकृत वेबसाइटवर असलेल्या फोन नंबरवर संपर्क करा.
- सोशल मीडियावर असणारी जाहिरात बारकाईने पहा. त्यात व्याकरणाची चूक असू शकते. अनेकदा गुन्हेगार फार शिकलेले नसतात, आणि इंग्रजी लिहिण्यात चुका करतात.

दरम्यान, आजकाल ऑनलाइन फसवणुकीची प्रकार खूप वाढले असून सोशल मीडियाचा वापर करताना सावध राहणं गरजेचं आहे.

## डोंबिवलीत खाडी किनाऱ्यावरील झाडाझुडपात अल्पवयीन विद्यार्थिनीवर सामूहिक अत्याचार; दोन नराधम गजाआड



डोंबिवली शहरात असलेल्या ठाकुर्लीतील खाडी किनारी झाडाझुडपात भर दिवसा पोलीस असल्याचं सांगत एका 17 वर्षीय अल्पवयीन विद्यार्थिनीवर दोन नराधमांनी बलात्कार केल्याची धक्कादायक घटना घडली होती. याप्रकरणी विष्णू नगर पोलीस ठाण्यात बलात्कारासह पोक्सो कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करून दोन्ही नाराधमाचा शोध सुरू केला. धक्कादायक बाब म्हणजे नराधम बलात्कार करतानाचे मोबाईलमध्ये चित्रीकरण करून पळून गेले होते. विष्णू सुभाष भांडेकर (वय 25, रा. नेवाळी नाका, कल्याण पूर्व ) आशिष प्रकाशचंद गुप्ता ( वय, 32 रा. डोंबिवली पूर्व ) असे मानपाडा पोलीस पथकाने शिताफीने शोध घेऊन 24 तासात अटक केलेल्या नराधमांची नावे आहे. पोलीस सूत्राने दिलेल्या माहितीनुसार शुक्रवारी 27 जानेवारी रोजी दुपारच्या सुमारास पीडित अल्पवयीन विद्यार्थिनी आपल्या एका मित्रासोबत ठाकुर्ली खाडी किनारा परिसरात फिरायला गेली होती. दोघे फिरत असताना दोन अनोखळी नराधम त्या ठिकाणी आले. त्यानंतर दोघाही नराधमांनी पीडितेला आणि तिच्या मित्राला पोलीस असल्याची थाप मारून सांगितले कि, तुम्ही या ठिकाणी आलात तुमच्याबद्दल तुमच्या पालकांना सांगितलं जाणार आहे, असं बोलून त्यापैकी एका नराधम पीडित विद्यार्थिनीला खाडी किनारी काही अंतरावर असलेल्या झाडाझुडपात घेऊन गेला. त्या निर्जनस्थळी तिच्यावर बळजबरीने बलात्कार केला. एवढंच नव्हे तर त्या नरधामाने त्याच्याकडील मोबाईलमध्ये बलात्कार करतानाचे चित्रीकरण करून कुठंही या घटनेची वाच्यता केल्याचे व्हिडीओ व्हारयरल करण्याची धमकी दिली.

## लातुरात लिपिकाने केलेला घोटाळा पोहचला 26 कोटींवर

लातूर जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल शाखेतील एका लिपिकाने विविध योजनांच्या सरकारी निधीतून केलेल्या घोटाळयात आता आणखी नवीन माहिती समोर आली आहे. ज्याने महसूल विभागात खळबळ उडाली आहे. लातूर शासकीय कार्यालयाशी संबंधित दोन बँक खात्यांतील 22 कोटी 87 लाख 62 हजार 25 रुपयांच्या रकमेचा अपहार झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली होती. मात्र पुढे सुरू असलेल्या तपासात रक्कमेत दिवसेंदिवस वाढ होताना दिसत आहे. तर 22 कोटींचा आकडा आता 26 कोटींच्या घरात गेला आहे. तर या घोटाळयाची लातूर जिल्ह्याभरात व्याप्ती वाढत आहे. असा सुरू होता घोटाळा... हा प्रकार 2015 ते 2022 असा एकूण सात वर्षांतील असून जलयुक्त शिवार अभियानांतर्गत निधी वितरणाचा आदेश काढल्यानंतर हा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी तहसीलदार महेश मुकुंद परांडेकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन चार जणांविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस पुढील तपास करत आहेत. लिपिक मनोज नागनाथ फुलेबोयणे यांच्यासह अरुण नागनाथ फुलेबोयणे, सुधीर रामराव देवकते, चंद्रकांत नारायण गोगडे यांच्याविरोधात शासनाची फसवणूक केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.काय आहे प्रकरण? महसूल शाखेतील तत्कालीन लिपिक मनोज नागनाथ फुलेबोयणे यांच्याकडे बँक खात्याचा कारभार होता. जलयुक्त शिवार अभियानांतर्गत निधी वितरणाचा आदेश होता. जलसंधारण अधिकाऱ्यांना दोन धनादेश देण्यात आले होते. ज्यामध्ये 12 लाख 27 हजार 297 रुपये आणि 41 लाख 06 हजार 610 रुपये आरटीजीएसद्वारे वितरित करण्यासाठी स्टेट बँक ऑफ इंडियाच्या जुन्या जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील शाखेत आरटीजीएस फॉर्म जमा करण्यात आले होते. मात्र, खात्यात केवळ 96 हजार 559 रुपये शिल्लक असल्याचे दिसून आले. यामुळे अपहार प्रकरणाचे धागेदोरे समोर आले. जिल्हाधिकाऱ्यांनी खात्यांचे लेखापरीक्षण करण्याचे आदेश काढले. तसेच अन्य एका खात्याचेही लेखापरीक्षण करण्यात आले. ज्यामध्ये स्वाक्षरी आणि मूळ रकमेत बदल केल्याचे निदर्शनास आढळून आले.


हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव ( पूर्व ), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर ( पूर्व ), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. ( सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत ).संपर्कः-9594418181 / 8424989898